वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" महाराष्ट्र शासन
वनविभाग

उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर
मु.पो.तालुका जुन्नर, दादोजी कोंडदेववाडा, जि. पुणे - 410502.

दूरध्वनी क्र. 02132 222063
Email ID: junnarforestdn@gmail.com / dycfjunnar@mahaforest.gov.in

क्रमांक-ब/कक्ष-4.2/जमीन/बैठक/ 152/2021-22, दिनांक 02/08/2021

प्रति,

**अधिक्षक अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास,**
**महामंडळ, पुणे.**
**नविन प्रशासकीय इमारत**
**कॅम्प पुणे** - 1.

**विषय :** पुणे वर्तुळ मार्ग (पुर्व) बांधणेकामी वन संवर्धन 1980 अंतर्गत वनजमीन मागणीचा प्रस्तावाबाबत. उप वनसंरक्षक जुन्नर यांचे दालनात दि. 27.07.2021 रोजी दुपारी 12.00 वा. घेतलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

**संदर्भ :** या कार्यालयाकडिल पत्र क्र. ब/ कक्ष - 4.2/जमीन/99/2021 दि. 23.07.2021.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी दिनांक 27.07.2021 रोजी दुपारी 12.00 वाजता अधिक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास, महामंडळ, पुणे यांची या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये उपस्थितांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सभेचा इतिवृत्तांत सोबत जोडण्यात आलेला आहे.

(जयरामेगौडा आर.)
उप वनसंरक्षक,
जुन्नर वनविभाग, जुन्नर

**प्रत** - मा. मुख्य वनसंरक्षक,(प्रा.), पुणे यांना माहितीसाठी रवाना.

Scanned by TapScanner

**वर्तुळ मार्ग (पुर्व) बांधणेकामी वन संवर्धन 1980 अंतर्गत वनजमीन मागणीचा प्रस्तावाबाबत. उप वनसंरक्षक जुन्नर यांचे दालनात दि. 27.07.2021 रोजी दुपारी 12.00 वा. घेतलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

| .क्र | विषय | दिलेले निर्देश | कार्यवाही कोणी करावयाची आहे. |
|---|---|---|---|
| 1 | पुणे वर्तुळ मार्ग (पुर्व) बांधणेकामी वन संवर्धन 1980 अंतर्गत वनजमीन मागणीचा प्रस्तावाबाबत. | प्रस्तावित पुणे रिंगरोड मध्ये बाधीत होणाऱ्या वनक्षेत्राबाबत चर्चा करण्यात आली. रिंगरोडमध्ये बाधित होणाऱ्या वनक्षेत्राची मोजणी झाली असून त्याचे क्षेत्रामध्ये तफावत येणार नाही. असे अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास, महामंडळ पुणे. श्री. नागरगोजे यांनी सांगितले. तसेच मौजे - सोळू येथील गट क्र. 585 चे वनसदृष वनक्षेत्र बाधित होत असल्याचे अधिक्षक अभियंता, यांना निदर्शनास आणून दिले असता सदर गट नं. 585 चे एकुण 13.64 हेक्टर क्षेत्रांपैकी 9 हेक्टर वनक्षेत्र वनसदृष जमीनीच्या यादीमध्ये समाविष्ट आहे.<br>सदर गटामधील कोणते क्षेत्र वनसदृष आहे. याची निश्चिती घेणेसाठी सदर गटाची फाळणी होणे आवश्यक असल्याचे चर्चाअंती ठरविण्यात आले. त्यानुसार महसुल विभागाकडून गटाची फाळणी होणेबाबत पुढील कार्यवाही करणेस उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी अधिक्षक अभियंता यांना सूचविले जेणेकरून प्रस्तावित रिंगरोडमध्ये सदर गटामधील वनक्षेत्राचा समावेश होतो किंवा कसे हे निश्चित करता येईल त्यास अधिक्षक अभियंता यांनी अनुमोदन दिले .<br>दिनांक 20.07.2021 रोजी आयोजीत सभेमध्ये कन्सलटन्ट यांनी रस्त्यांची आखणी बदलू शकते असे सांगीतले होते. याविषयी विचारले असता रस्त्याचे आखनी कायम असून ती बदलणार नसल्याचे श्री. नागरगोजे यांनी सांगितले.प्रस्तावात रस्त्याच्या तीन पर्यायी आखणीचे नकाशे व त्या नाकारण्याची कारणे प्रस्तावात सादर करणेबाबत उपवनसंरक्षक, जुन्नार यांनी सुचविले. त्याप्रमाणे पुर्तता करणेत येईल असे अधिक्षक अभियंता यांनी सांगितले. | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे. |

(जयरामेगोडा आर.)
उप वनसंरक्षक
जुन्नर वनविभाग, जुन्नर

Scanned by TapScanner